ePaper

## ‘पक्ष मेले तरी चालतील, महाराष्ट्र जगला पाहिजे’ : राज ठाकरे



॥ वर्ष - 8 । अंक -116 ॥ UDYAM-MH-26-0158827॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ मंगळवार, दिनांक 5 नोव्हेंबर 2024 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

### आतील पानांत

- घटस्फोटानंतर धवन पुन्हा प्रेमात?
- ‘प्लीज मला हरवू नकोस हां...!
- बायडेन विरुद्ध मस्क कलगीतुरा!
- समान नागरी कायदा लागू होईल!

## चिंचवडमध्ये धक्कादायक प्रकार

# निवडणूक अधिकाऱ्याची गाडी पेटवली!

## मोठी दुर्घटना टळली : काळेवाडी येथे अपक्ष उमेदवार ताब्यात

। पिंपरी । महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली आहे. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीला केवळ १५ दिवस उरले आहेत. उमेदवारांनीही आपल्या प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे. एका अपक्ष उमेदवाराने निवडणूक अधिकाऱ्याची गाडी पेटवून दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अपक्ष उमेदवाराला ताब्यात घेतलं आहे. या घटनेमुळे खळबळ माजली आहे.**



पिंपरी-चिंचवडमध्ये हा सगळा धक्कादायक प्रकार घडला आहे. दृष्टिहीन उमेदवार विनायक ओव्हाळ यांनी शासकीय कार्यालयात विधानसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांची गाडी पेटवण्याचा प्रयत्न केला आहे.

काळेवाडी पोलिसांनी याप्रकरणी विनायक ओव्हाळ यांना ताब्यात घेतलं आहे. वेळीच आग नियंत्रणात आणण्यात आल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. पोलिसांनी ही आग आटोक्यात आणली.

या घटनेत विनायक ओव्हाळ यांच्यासोबत नागेश काळे आणि अजय गायकवाड हे आणखी दोघे उपस्थित होते. काळे सुद्धा दिव्यांग असून त्यांच्याच रिक्षातून ओव्हाळ हे ग प्रभागात आले होते. त्याचवेळी हा सगळा धक्कादायक प्रकार घडला.

दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी अपक्ष नाना काटे यांच्यासह फक्त सात उमेदवारांनी माघार घेतली आहे.

त्यामुळे आता महायुतीचे शंकर जगताप, महाविकास आघाडीचे राहुल कलाटे आणि अपक्ष भाऊसाहेब भोईर यांच्यात प्रमुख लढत होणार आहे.

### रमाई आवास योजनेत घर दिले नाही...

या घटनेत निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्या गाडीचे नुकसान झाले आहे. ओव्हाळ यांनी गाडी पेटवून देण्याचा प्रयत्न का केला, याची चौकशी पोलिसांकडून सुरू आहे. उमेदवारी अर्जाबाबत दोघांमध्ये काही वाद झाला होता का, याबाबत पिंपरी-चिंचवडमध्ये चर्चा सुरू आहे. वारंवार पाठपुरावा करून ही रमाई आवास योजनेत घर मिळालं नाही, रसवंती आणि फटाका स्टॉल लावण्यास परवानगी दिली नाही. तसेच पालिकेच्या थेरगाव रुग्णालयात कॅन्टीनला लावण्याची परवानगी दिली नाही, यामुळं ओव्हाळ यांनी गाडी पेटवून दिल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.

## जुन्नरमध्ये महायुतीत बिघाड; मविआत अलबेल!

## विधानसभा निवडणूक : शरद सोनवणे, आशाताई बुचकेंची बंडखोरी कायम

। पुणे ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे शहराच्या ८ विधानसभा मतदार संघात काँग्रेसच्या बंडखोरीने महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढली आहे. तर ग्रामीण भागात महायुती आणि महाविकास आघाडी दोघांकडे बंडखोरी कायम ठेवल्याचे दिसून आले आहे.



जुन्नरच्या विधानसभा मतदार संघात महायुतीची डोकेदुखी वाढली आहे. शिवसेना शिंदे गटाचे शरद सोनवणे, भाजपनेत्या आशाताई बुचके यांनी अपक्ष म्हणुन उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने महायुतीमध्ये बिघाडी झाल्याचे चित्र पुढे आले आहे.

तर शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) खंडागळे यांनी माघार घेतल्यामुळे महाविकास आघाडीत सर्व काही आलबेल असल्याचे चित्र पुढे आले आहे.

जुन्नर विधानसभा मतदारसंघात एकूण १७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते .यापैकी सहा उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. निवडणूक रिंगणात ११ उमेदवार उरले आहेत.

महाविकास आघाडीत अलबेल असून, महायुतीमध्ये मात्र पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी वाढली आहे.

### पंचरंगी लढत होणार...

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार अतुल बेनके,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार सत्यशील शेतकर , वंचित आघाडीचे देवराम लांडे , प्रमुख अपक्ष उमेदवार माजी आमदार शरद सोनवणे, आशाताई बुचके या पाच उमेदवारांसह इतर सहा अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तसेच, आशाताई बुचके व शरद सोनवणे यांनी उमेदवारी कायम ठेवल्याने पंचरंगी झालेल्या या लढतीत चांगलीच रंगत निर्माण झाली आहे. ज्ञानेश्वर (माऊली ) खंडागळे जुबेर अस्लम शेख ,योगेश तोडकर, काळू गागरे ,रमेश पाडेकर, निलेश भुजबळ या उमेदवारांनी माघार घेतली आहे.

# माणसं जोडणारा हिरा गवसला!

## डॉ. रघुनाथ माशेलकर : चंद्रकांत पाटील यांच्या विकासकामांचे कौतूक

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी डॉ. माशेलकर यांनी चंद्रकांतदादा पाटील यांच्या कामाचे भरभरुन करत, कोथरुडकरांना माणसं जोडणारा हिरा गवसला असल्याचे गौरवोग्दार काढले.**



विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला रंग चढायला सुरुवात झाली आहे. कोथरुडचे आमदार आणि राज्याचे विद्यमान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी उमेदवारी जाहीर झाल्यापासून प्रचारात मोठी आघाडी घेतल्याचे पाहायला मिळत आहे. आज चंद्रकांतदादा पाटील यांनी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी चंद्रकांतदादांनी आपल्या गत पाच वर्षाच्या कार्याचा कार्य अहवाल डॉ. माशेलकर यांच्याकडे सादर केला, तो त्यांनी सविस्तर पाहिला. पाच वर्षांत केलेल्या कामांची यादी आणि उपक्रम पाहून डॉ. माशेलकर यांनी चंद्रकांत दादांचे मनापासून कौतुक केले. यावेळी चंद्रकांतदादांच्या कोथरुड मधील आरोग्य विषयक योजनांची डॉक्टरांनी आवर्जून माहिती घेतली.

यावेळी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनीही कृतज्ञता व्यक्त केली. दरम्यान, यावेळी डॉ. माशेलकर यांनी चंद्रकांतदादा पाटील यांच्या गुरु पौर्णिमेनिमित्तच्या गुरुपूजन उपक्रमाचेही भरभरुन कौतुक केले. तसेच, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ. सागर देशपांडे हे देखील उपस्थित होते.

### कोथरुड राज्याची सांस्कृतिक राजधानी

कोथरुड ही राज्याची संस्कृतिक राजधानी आहे. इथे प्रत्येक व्यक्तीची एक वेगळीच ओळख आहे. खरंतर एखादा व्यक्ती विशेष करुन राजकीय व्यक्ती मोठ्या पदावर पोहोचल्यावर त्याच्या स्वभावातही फरक पडतो. विनयशिलता, नम्रपणा कमी होतो. पण चंद्रकांतदादा पाटील यांनी आपल्यालातील विनयशीलता, नम्रपणा आणि समाजाप्रती समर्पित होऊन काम करण्याचा गुण सोडलेला नाही. गेल्या पाच वर्षात चंद्रकांतदादा पाटील यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून कोथरुडकरांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं आहे. चंद्रकांतदादा पाटील यांच्या रुपाने कोथरुडकरांना माणसं जोडणारा हिरा गवसला आहे, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

---

# आमदारांच्या कामाचे श्रेय लाटण्याचा विरोधकांचा प्रयत्न!

## वाकडच्या विकासाला स्व. आ. लक्ष्मण जगताप यांच्यामुळेच गती!

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभेतून निवडणूक लढविणाऱ्या वाकडमधील स्थानिक उमेदवाराने वाकड गावच्या विकासासाठी काहीही केले नाही. याउलट त्यांच्यामुळे अनेक वर्ष गावातील विकासकामांना खीळ बसला होता. मात्र स्व. आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार अश्विनी जगताप यांच्या माध्यमातून गावात झालेल्या विकासाकामांमुळे या वाकड गावचा कायापालट झाला.**



चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप- शिवसेना-राष्ट्रवादी- आरपीआय (आठवले) व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांनी आज वाकड परिसरातील विविध वस्त्या आणि सोसायट्यांना भेट देऊन स्थानिक ग्रामस्थ आणि नागरिकांच्या भेटी गाठी घेत दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. या गावभेट दौऱ्यात शंकर जगताप यांनी पदयात्रा काढत नागरिकांच्या गाठी-भेटी घेतल्या.

नागरिकांकडून दीपावलीच्या शुभेच्छांचा स्वीकार करीत जगताप यांनी त्यांची आपुलकीने विचारपूस केली. तसेच त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी वाकडकरांनी जगताप यांचे जंगी स्वागत केले. "आज जो वाकडचा हा विकास दिसून येत आहे त्याचे सर्व श्रेय हे स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांचे आहे.

त्यामुळे यापुढेही वाकडच्या विकासासाठी आम्ही सर्व ग्रामस्थ शंकर जगताप यांच्यासोबत आहोत, असा विश्वास यावेळी नागरिकांनी जगताप यांना दिला. दरम्यान, शंकर जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघातून प्रचाराची मोठी आघाडी घेतली असून त्यांना समाजातील सर्व स्तरातील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः महिला वर्गही या पदयात्रेत हिरीरीने सहभागी होत असल्याचे दिसून येत आहे. या गावभेट दौऱ्यात शंकर जगताप यांनी पदयात्रा काढत नागरिकांच्या गाठी-भेटी घेतल्या.

नागरिकांकडून दीपावलीच्या शुभेच्छांचा स्वीकार करीत जगताप यांनी त्यांची आपुलकीने विचारपूस केली. तसेच त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी वाकडकरांनी जगताप यांचे जंगी स्वागत केले.

"आज जो वाकडचा हा विकास दिसून येत आहे त्याचे सर्व श्रेय हे स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांचे आहे. त्यामुळे यापुढेही वाकडच्या विकासासाठी आम्ही सर्व ग्रामस्थ शंकर जगताप यांच्यासोबत आहोत, असा विश्वास यावेळी नागरिकांनी जगताप यांना दिला. दरम्यान, शंकर जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघातून प्रचाराची मोठी आघाडी घेतली असून त्यांना समाजातील सर्व स्तरातील नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

### वाकडची जनता सूज्ञ : शंकर जगताप

वाकडमधील विरोधकांचं म्हणणं आहे की वाकडमध्ये कोणतेही विकासकामे झालेली नाहीत. मात्र दुसरीकडे स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप आणि आमदार अश्विनी जगताप यांच्या आमदरनिधीतून झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करायचा. आमदार निधीमधून वाकडमध्ये सांस्कृतिक भवनची उभारणी, योगा हॉल, ठिकठिकाणी ओपन जिम, वाहतूक बेटाची निर्मिती, महिला व पुरुषांसाठी ई-टॉयलेटची सुविधा, समाज मंदिर, विविध सोसायट्यांमध्ये विद्युत सोलर सिस्टीम, ग्रीड सोलार पावर प्लांट व रुफ टॉप बसविणे, शासकीय जागेत इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे, अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण, काँक्रीटीकरण, ड्रेनेज लाईन तसेच जलनिस्सारण लाईन टाकणे असे सुमारे तीन ते साडे तीन कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत. तरीदेखील विरोधकांकडून प्रभागात काम न झाल्याचे आरोप केले जातात. त्यामुळे विरोधकांचे आपल्या प्रभागात किती लक्ष आहे हे स्पष्ट होते. आपली निष्क्रियता लपविण्यासाठीच विरोधकांकडून हे बिनबुडाचे आरोप करण्यात येत आहे. मात्र वाकडची जनता सुज्ञ असून ती या खोट्या भूलथापांना बळी न पडता विकासकामांना मत देतील, असा दावा महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी केला आहे.

## ‘बनसोडे पॅटर्न’ : सर्वांना विश्वासात घेऊन काम करणार

# आमदार बनसोडे ‘ऑन फायर मोड’!

## महाविकास आघाडीला दणका: 21 पैकी 19 अपक्षांचा जाहीर पाठींबा

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले) या महायुतीची ताकद वाढली आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेतलेल्या २१ जणांपैकी १९ उमेदवारांनी महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांना पाठिंबा दिला आहे. उमेदवारांनी पाठिंबा दिल्यानंतर आमदार अण्णा बनसोडे यांनी सर्वांना विश्वासात घेऊन काम करणार असल्याची ग्वाही दिली.**



आकुर्डी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे, सदाशिव खाडे, अजिज शेख, संतोष बारणे, परशुराम वाडेकर, कविता आल्हाट, अंकुश कानडे, सिकंदर सूर्यवंशी, कुणाल वाव्हळकर, चंद्रकांता सोनकांबळे, काळूराम पवार, सुधीर कांबळे, जितेंद्र ननावरे, बाबासाहेब कांबळे आणि इतर पदाधिकारी, उमेदवार उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज माघार घेण्याची सोमवारी (दि.४) अंतिम मुदत होती. महायुतीच्या घटक पक्षातील बंडखोरी करून उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी तसेच शहरातील नेत्यांनी समजूत काढली. सर्वांनी महायुतीची ताकद वाढविण्यासाठी तसेच राज्याच्या हितासाठी महायुतीचा मुख्यमंत्री होणे गरजेचे असल्याचे सांगत उमेदवारांना अर्ज माघारी घेण्यास सांगितले. महायुतीतील नेत्यांना उमेदवारांच्या मनधरणीसाठी मोठे यश मिळाले आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेतलेल्या २१ जणांपैकी तब्बल १९ जणांनी पिंपरी विधानसभेचे महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच उमेदवारांनी अण्णा बनसोडे यांचे काम सक्रियपणे करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

> “ ज्या उमेदवारांनी अर्ज दाखल केला होता त्यांना विश्वासात घेऊन महायुतीमध्ये एकत्रितपणे काम करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. त्यामध्ये आम्हाला यश आले आहे. रामदास आठवले, अजित पवार यांनी चंद्रकांता सोनकांबळे यांच्याशी चर्चा केली. चंद्रकांता सोनकांबळे यांना भविष्यात चांगले पद मिळण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्न करणार आहोत.
>
> **–योगेश बहल,** शहराध्यक्ष राष्ट्रवादी.

### महत्त्वाचे पद देण्याचे आश्वासन : चंद्रकांता सोनबांबळे

चंद्रकांता सोनकांबळे म्हणाल्या, “आम्ही दरवेळी तिकिटाची मागणी करतो पण आम्हाला तिकीट मिळत नाही. या वेळी राज्यस्तरावर चांगले काम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पद देण्याचे आश्वासन युतीमधील नेत्यांनी दिले आहे. त्यामुळे या निवडणुकीत आम्ही आमदार अण्णा बनसोडे यांचे काम करणार आहोत.”

तसेच, “व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा असतो पक्षासाठी काम करण्याच्या सूचना वरिष्ठांनी दिल्या आहेत. आम्ही एकत्रितपणे आमदार अण्णा बनसोडे यांचे काम करणार असून त्यांना ५० हजारांचे मताधिक्य मिळेल, असा विश्वास उमेदवार काळुराम पवार यांनी व्यक्त केला.

> “ निवडणूक लढविण्याचा लोकशाहीत सर्वांना अधिकार आहे. पण पक्ष, संघटना यामध्ये काम करत असताना आपण एक कुटुंब आहोत. त्यातून कोणाला तरी एकाला जबाबदारी मिळते. महायुतीमध्ये पिंपरी विधानसभेची जबाबदारी मला मिळाली आहे. दरम्यान महायुतीमधील ज्येष्ठ नेत्यांनी नाराज उमेदवारांची नाराजी दूर केली आहे. त्यामुळे आता सर्वांना विश्वासात घेऊन काम करणार आहे.”
>
> **–आण्णा बनसोडे,** आमदार, उमेदवार.

---

## मोशीकरांचा निर्धार : महेश लांडगेंना करणार तिसऱ्यांदा आमदार!

## मिशन विधानसभा : महायुतीच्या आपुलकीच्या गाठी-भेटींना उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी- आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या मोशीतील प्रचार फेरीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. समाविष्ट गावांच्या विकासासाठी ज्याने पुढाकार घेतला. त्या महेश लांडगे यांना आम्ही साथ देणार, असा निर्धार यावेळी मोशीकरांनी केला.**




भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांनी पहिल्या टप्प्यात प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. रविवारी सुट्टीचे निमित्त साधत समाविष्ट गावात प्रचार केला. मोशी परिसरात काढलेल्या प्रचार फेरीला मोठा प्रतिसाद मिळाला. दरम्यान, बोराटेवस्ती येथे निवडणूक कचेरीचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर हजारे वस्ती, वाघजाई मित्र मंडळ, बनकर वस्ती, टेकाळे, आल्हाट, खिराडी, पुणे-नाशिक हायवे, गणेशनगर, स्वामी समर्थ कॉलनी 1, 2, 3, गायकवाड वस्ती, भारतमाता चौक, नागेश्वर नगर 1, 2, 3 या परिसरात प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचार फेरीत माजी महापौर राहुल जाधव, माजी महापौर नितीन काळजे, राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, माजी नगरसेविका अश्विनी जाधव, सारिका बो-हाडे यांच्यासह सर्व माजी नगरसेवक, मोशी, ग्रामस्थ, महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते फेरीत सहभागी झाले होते.

> “ १९९७ पासून समाविष्ट गावांकडे तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी विकासाच्या बाबतीत आणि राजकीय प्रतिनिधीत्व देण्यास दुर्लक्ष केले. भाजपा सत्ताकाळात २०१७ नंतर या गावांच्या विकासाला चालना मिळाली आणि दोन महापौर आणि विविध समितीच्या सभापतीपदाची संधी देता आली. त्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा सक्षम झाल्या. वेस्ट टू एनर्जी, संतपीठ, आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, आयआयएम कॅम्पस, मोशी हॉस्पिटल, पिंपरी-चिंचवड न्यायालय संकूल, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शाखा समाविष्ट गावांमध्ये होत आहे, ही बाब निश्चितच आश्वासक आहे.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, समाविष्ट गावातील नागरिकांना मला राजकारणात संकटात असताना साथ दिली. माझ्या संघर्षाच्या काळात या भागातील नागरिक ठामपणे पाठीशी उभे राहिले. त्यामुळे समाविष्ट गावांतील नागरिकांना मी विसरू शकत नाही. समाविष्ट गावातील नागरिकांची उतराई होण्यासाठी या भागात विकासाची गंगा आणली आहे. या भागाचा कायापालट करण्याचा माझा प्रयत्न आहे. २०१७ पासून समाविष्ट गावात सर्वात मोठी विकास कामे केली आहेत. या भागासाठी सर्वाधिक आमदार निधी दिला आहे. यापुढेही समाविष्ट भागातील विकास कामे करण्यात कमी पडणार नाही.

# रंग पंढरीचे वारकरी...



विशेष

राहुल जगताप
7972807004



**रंगदेवता आणि नाट्य रसिकांना विनम्र अभिवादन करून सविनय सादर करीत आहोत, हे शब्द आपल्या कानावरती पडतात तेव्हा आपल्या डोळ्यासमोर चित्र उभारते ते नाट्यगृहाचे म्हणजेच रंगभूमीचे!**

मराठी रंगभूमी दिन

मराठी रंगभूमीचा इतिहास खूप मोठा आहे. विष्णुदास भावे यांच्या स्मृतिदिनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात / भारतात हा दिवस साजरा केला जातो, विष्णुदास भावेंचा जन्म सांगलीमध्ये झाला म्हणून आणि विष्णुदास भावे यांनी पहिलं नाटक सांगलीच्या राजदरबारी सादर केलं. तर एकाच नाटकावरती ते न थांबता असंख्य नाटकाचे अनेक प्रयोग त्यांनी केले. म्हणूनच सांगलीला नाट्य पंढरी म्हटले जाते. हाच वसा आणि वारसा त्यांनी सांगलीच्या पुढच्या रंगकर्मींच्या हाती दिला, त्यामुळेच नाट्य क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा समजला जाणारा पुरस्कार त्यांच्याच नावे 'विष्णुदास भावे गौरव पुरस्कार' दिला जातो.

नाट्य क्षेत्रातील बऱ्याच रंगकर्मींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रंगभूमीचा हा प्रवास संगीत नाटकापासून सुरू होतो तर ऐतिहासिक नाटक कौटुंबिक नाटक कॉमेडी नाटक ते आत्तापर्यंतच्या वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करणाऱ्या एकांकिका इथपर्यंतचा हा प्रवास खूप उल्लेखनीय आहे. म्हणूनच रंगभूमीच्या या प्रवासाला प्रेक्षकांनी दिलेली भरभरून साथ ही देखील फार महत्त्वाची आहे. समाजामध्ये ज्या चांगल्या गोष्टींचे परिवर्तन झाले आहे, त्यामध्ये नाटक, एकांकिका, पथनाट्य, लघुनाट्य, मूकनाट्य या नाटकाच्या विविध अंगांचा खूप महत्त्वाचा वाटा आहे. पूर्वीच्या काळामध्ये तर समाजामध्ये प्रबोधन करण्यासाठी नाटकाचा खूप उपयोग होत असे आणि अशाच नाटकाचे प्रयोग पाहण्यासाठी प्रेक्षकवर्ग ही उत्साहाने नाट्यगृहात यायचा. तर मधल्या काळामध्ये लोकांच्या वाढत्या अपेक्षा त्यातून निर्माण होणारे नैराश्य ताण तणाव थकवा या सर्व गोष्टींची औषध सुद्धा नाटक नावाच्या दवाखान्यात मिळत असे म्हणजेच ताण तणाव दूर करण्यासाठी एखादे मनोरंजन करणारे नाटक पाहून आपल्या चेहऱ्यावर स्मितहास्य आले की समजावं आपल्याला ताण-तणावाचे औषध मिळालं आहे, आणि म्हणूनच काय तर रंगमंचावरती कॉमेडी नाटकाचा प्रयोग हाउसफुल व्हायचा.. रंगमंचावर सादर होणाऱ्या नाटकाचे वेगवेगळे प्रयोग पाहिल्यानंतर प्रेक्षक भारावून जात असे. त्यातून कलाकारांच्या आणि रसिक प्रेक्षकांच्या हळूहळू असे लक्षात येऊ लागले की नाटक ही जीवन समृद्ध करणारी कला आहे. नाटकामुळे समाजात प्रबोधन तर होतेच पण त्या अगोदर नाटकामध्ये काम करणाऱ्या कलाकारापासून ते नाटक पाहणाऱ्या रसिक प्रेक्षकांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून जातो. कितीही मोठं दुःख असलं तरी त्याला बाजूला सरकवून यशाच्या मार्गावरती चालायला नाटक शिकवतो. कितीही मोठा समज-गैरसमज निर्माण झाला असला तरी तो बाजूला सारून एखादं नातं किती महत्त्वाचं आहे. त्या समज, गैरसमजांपेक्षा या गोष्टींची ओळख सुद्धा नाटक करून देत. या सर्व गोष्टींमुळे रसिक प्रेक्षकांनी वेगवेगळ्या नाटकांना भरभरून दाद दिली. एखाद्या गोष्टीचा अविष्कार जेवढा तारक असतो त्याच तुलनेत तो मारक देखील ठरू शकतो, कारण रंगमंचावर नाटकाचे प्रयोग सादर करणाऱ्या कलाकारांनी आपला प्रवास हळूहळू मोबाईल वरती असणाऱ्या TIKTOK रील्स या गोष्टींकडे वळवला आणि नाट्यगृहाच्या बाहेरची गर्दी हळुवार कमी होऊ लागली. कोणत्याही विषयावर एखादी रिल्स करायची आणि झटपट लोकप्रिय व्हायचं हा दृष्टिकोन समोर ठेवून रिल्स बनवल्या जातात. मग समाजामध्ये त्याचा कितीही दुष्परिणाम होऊ दे याचीदेखील परवा करायची नाही. समाज व्यवस्थेचं काही का होईना फक्त आपण लोकप्रिय झालो पाहिजे हाच काही लोकांचा दृष्टिकोन समाज व्यवस्थेस मारक ठरू शकतो. अर्थात मोबाईल वरती ज्या रील्स बनवल्या जातात त्या सर्व चुकीच्या आहेत असं माझं अजिबात मत नाही.

परंतु नाटकामध्ये कोणत्याही विषयाची हाताळणी अभ्यासात्मक असते त्या तुलनेत रिल्समध्ये पहायला मिळत नाही नाटकामध्ये एखादा कलाकार ती भूमिका करण्यासाठी जी मेहनत घेतो त्यातून त्या कलाकाराला नाटक सादर झाल्यानंतर जर तुम्ही विचारलं की काय रे... या नाटकातून तुला काय मिळालं तर तो कलाकार लगेच सांगतो की या नाटकाच्या प्रयोगातून मला समाधान मिळालं. त्यावेळेस मनामध्ये प्रश्न निर्माण होतो की हे समाधान नेमकं काय असतं अर्थात त्यासाठी आपल्याला एखादी भूमिका रंगमंचावर साकारावीच लागेल. तेव्हाच त्या समाधानाची व्याख्या आपल्या लक्षात येईल. मग प्रश्न हाच निर्माण होतो की हे समाधान रिल्स करणाऱ्या कलाकारांना मिळतं का??

रिल्स टिक टॉक, वेब सिरीज या आत्ताच्या गर्दीच्या जगामध्ये कॉलेजच्या युथ फेस्टिवलची तयारी करणारी मुलं-मुली तसेच वेगवेगळ्या एकांकिका स्पर्धेची तयारी करणारे कलाकार व राज्य नाट्य स्पर्धेच्या आखाड्यात उतरणारे रंगकर्मी यांच्याकडे पाहिलं की रंगभूमीचं भविष्य खूप मोठा आहे याची जाणीव होते. युथ फेस्टिवल मध्ये आपली एकांकिका (नाटक) सर्वोत्तम झाले पाहिजे यासाठी तहानभूक विसरून कॉलेजची मुलं धडपडत असतात, कॉलेज जीवनामध्ये डोक्यावरच्या केसांचा भांग जरा देखील विस्कटून न देणारी मुलं-मुली या एकांकिका (नाटकांमध्ये) सहभाग घेतात, तेव्हा नाटकासाठी लागणार साहित्य आपल्या डोक्यावरती घेऊन कॉलेजच्या संपूर्ण परिसरामध्ये फिरतात तेव्हा लक्षात येऊ लागतं की नाटक माणूस घडवत ते...

तर एकांकिका स्पर्धेला जाताना कलाकारांची आर्थिकदृष्ट्या जी तारेवरची कसरत होते आणि त्यातून ते कलाकार मार्ग काढतात त्यावेळी जाणवतं की नाटकामुळे माणसाचं आयुष्य समृद्ध होतं.

मग राज्य नाट्य स्पर्धेची तयारी सुरू होती आणि प्रत्येक रंगकर्मी उत्साहाने नाटकाची तालीम सुरू करू लागतो नवा दिवस, नवं नाटक, नवी भूमिका, याच विश्वासाने प्रत्येक रंगकर्मी कामाला लागतो आणि त्याच दरम्यान बहुतांशी रंगकर्मींच्या जीवनामध्ये कौटुंबिक वेगवेगळे कलह सुरू होतात. व त्यातून सुद्धा प्रत्येक रंगकर्मी जबाबदारीने मार्ग काढतो. आलेलं प्रत्येक संकट धुडकावून लावतो तेव्हा असं लक्षात येऊ लागतं की विष्णुदास भावे यांच्या नाट्य पंढरीतील हेच ते खरे रंग पंढरीचे वारकरी आहेत.

नाटक घडत राहो ...

## प्रासंगिक »

### सुज्ञ की सैतान?

***वातावरणबदल आदी वास्तव मुद्द्यांपेक्षा स्थलांतरित आदी कथित मुद्द्यांना महत्त्व देणारे ट्रम्प यांनी लावलेला द्वेषवृक्ष अमेरिकी प्रचारात बहरतो आहे...***

साऱ्या विवेकी जगाच्या हृदयाची धाकधूक वाढवणारी घटना या आठवड्यात घडेल. ती म्हणजे अमेरिकेची अध्यक्षीय निवडणूक. या जागतिक धाकधुकीचे भवितव्य तेथील जनतेने रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प वा डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांच्यापैकी कोणास कौल दिला या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून असेल. म्हणजे ही धाकधूक थांबणार की पुढील चार वर्षांसाठी उत्तरोत्तर वाढणार हे या निवडणुकीत स्पष्ट होईल.

त्या देशाच्या रीतीप्रमाणे पहिल्या नोव्हेंबरातील पहिल्या सोमवारनंतरच्या मंगळवारी ५ नोव्हेंबरला या निवडणुकीत अमेरिकेचा अध्यक्ष निवडला जाणार असला तरी तांत्रिक अर्थाने ही अध्यक्षीय निवडणूक म्हणता येत नाही. कारण विविध राज्यांत विखुरलेली अमेरिकी जनता प्रत्यक्षात राजकीय पक्षास मत देत असते.



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मधुरिमाराजे यांची निवडणुकीतून माघार

## कार्यकर्त्यांशी बोलताना सतेज पाटलांना अश्रू अनावर

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. आज (४ नोव्हेंबर) उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे अनेक मतदारसंघात घडामोडी पाहायला मिळाल्या. मात्र, कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षात मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी अचानक निवडणुकीतून माघार घेतली. तसेच राजेश लाटकर यांना पक्षाने उमेदवारी नाकारली होती. मात्र, त्यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला. त्यामुळे उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या काही तासात कोल्हापूर जिल्ह्यातील काँग्रेसमध्ये मोठा गोंधळ पाहायला मिळाला.



यातच मधुरिमाराजे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे काँग्रेसचे नेते सतेज पाटील हे चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. "मला कशाला तोंडघशी पाडलं? दम नव्हता तर उभं राहायचंच नव्हतं ना", अशा शब्दांत सतेज पाटील यांनी आपला संताप व्यक्त केला. त्यांचा हा व्हिडीओही व्हायरल झाला. यानंतर सतेज पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. मात्र, कार्यकर्त्यांशी संवाद साधताना सतेज पाटलांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. मधुरिमाराजे छत्रपती यांनी अचानक उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे सतेज पाटील कार्यकर्त्यांशी बोलताना भावूक झाले.

"मला आज दोन वाजून ३६ मिनीटांनी मालोजीराजे यांचा फोन आला आणि त्यांनी सांगितलं की, उमेदवारी अर्ज माघार घेणार आहोत. मी त्यांना म्हटलं की असा निर्णय घेऊ नका. कारण एक उमेदवारी बदलून दुसरी उमेदवारी काँग्रेस पक्षाने माझ्यासारख्या नेत्यावर विश्वास ठेऊन दिली होती. मी त्यांना म्हटलं की, कितीही संकटे असू द्या. पण असा निर्णय घेऊ नका. शेवटी जेव्हा निवडणूक लागते तेव्हा आपण निवडणुकीत ताकदीने उतरतो. मी त्यांना म्हटलं की काहीही काळजी करू नका. काही झालं तर ती जबाबदारी बंटी पाटील म्हणजे माझी असेल आणि असं सांगितलं आणि फोन बंद केला. त्यानंतर मी लगेचच जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचलो. त्यानंतर काय घडलं? याच व्हिडीओ सर्वांनी पाहिला असेल. कारण ती परिस्थिती माझ्या हातात नव्हती. काय घडतंय हे मला समजलं नव्हतं. आता त्यांचा हात उमेदवारी थांबवणं मला देखील संयुक्तिक वाटतं नव्हतं. तेव्हा माझ्याकडून एखादं वाक्य जाऊ नये, त्यामुळे मला लोकांनी गाडीत बसवलं आणि जायला सांगितलं. आता सर्व हे घडल्यानंतर माझ्याकडे उत्तर नव्हतं", असं सतेज पाटील यांनी म्हटलं आहे.सतेज पाटील पुढे म्हणाले, "मला महाराष्ट्रभरातून सर्वांचे फोन येत आहेत. नाना पटोले यांचाही फोन आला. उद्धव ठाकरेंचाही फोन आला. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्यांचाही फोन आला, सर्वांचे फोन येत आहेत. ही उमेदवारी मागे घेण्याची घटना घडल्यानंतर माझीही थोडी नैतिक जबाबदारी दडपण आहे. नेता म्हणून हे घडायला नव्हतं पाहिजे. हे माझ्या करिअरच्या दृष्टीनेही माझ्यावर नैतिक दडपण आहे. मात्र, मला थोडा वेळ द्या, उद्या योग्य तो निर्णय घेतो. मी काही वेळापूर्वीही गाडीत पदाधिकाऱ्यांना म्हटलं की माझ्या डोळ्यात पाणी आलं आणि...", असं म्हणत सतेज पाटील यांना अश्रू अनावर झाले.दम नव्हता तर उभं राहायचंच नव्हतं ना", अशा शब्दांत सतेज पाटील यांनी आपला संताप व्यक्त केला. त्यांचा हा व्हिडीओही व्हायरल झाला. यानंतर सतेज पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. मात्र, कार्यकर्त्यांशी संवाद साधताना सतेज पाटलांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं.

### मी म्हटलं की असा निर्णय घेऊ नका

मधुरिमाराजे छत्रपती यांनी अचानक उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे सतेज पाटील कार्यकर्त्यांशी बोलताना भावूक झाले."मला आज दोन वाजून ३६ मिनीटांनी मालोजीराजे यांचा फोन आला आणि त्यांनी सांगितलं की, उमेदवारी अर्ज माघार घेणार आहोत. मी त्यांना म्हटलं की असा निर्णय घेऊ नका. कारण एक उमेदवारी बदलून दुसरी उमेदवारी काँग्रेस पक्षाने माझ्यासारख्या नेत्यावर विश्वास ठेऊन दिली होती. मी त्यांना म्हटलं की, कितीही संकटे असू द्या. पण असा निर्णय घेऊ नका. शेवटी जेव्हा निवडणूक लागते तेव्हा आपण निवडणुकीत ताकदीने उतरतो. मी त्यांना म्हटलं की काहीही काळजी करू नका.

# एकदा एक कॅमेरावाला बाथरूमपर्यंत आला होता

## राज ठाकरेंनी सांगितली आचारसंहितेच्या काळातील गंमत!

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

महाराष्ट्रात निवडणुका जाहीर झाल्याने आचारसंहिता लागली आहे. १५ ऑक्टोबरपासून राज्यात आचारसंहिता लागू झाली असून निवडणुकीच्या प्रचारांचीही धामधुमी सुरू झाली आहे. दिवाळी संपल्यानंतर आजचा पहिला दिवस राज ठाकरेंनी गाजवला. कल्याण आणि ठाण्यातील प्रचारसभांमध्ये त्यांनी सत्ताधारी पक्षाला लक्ष्य केलं अन् त्यांचा समाचार घेतला. यावेळी त्यांनी पूर्वी आचारसंहितेत वेळेच बंधन कसं असायचं यावर भाष्य केलं.




राज ठाकरे म्हणाले, "मघाशी शरद पोंक्षे म्हणाले की राज ठाकरेंना वेळ नाही. पण माझ्याकडे खूप वेळ आहे, परंतु या आचारसंहितेवाल्यांना वेळ नाहीय. त्यामुळे दहाच्या आत आटपायला लागतं. पूर्वी बरं होतं, सन १९९५ ला आचारसंहिता लागली तेव्हा इतर माध्यमं नव्हती. आचारसंहितेचा एक कॅमेरा असायचा. जिथं जाऊ तिथे मागे मागे फिरायचा. मी विनोदाने सांगत नाही. एकदा एक कॅमेरावाला बाथरूमपर्यंत आला होता. मी त्याला विचारलंही की पुढचंही आपणच करणार आहात का?" असा गंमतीशीर अनुभव राज ठाकरेंनी सांगितला. ते पुढे म्हणाले, "पण एक कॅमेरा असायचा. त्या कॅमेऱ्यात जे शूट होईल ते होईल. त्यावेळी ते आम्हाला सोपंही जायचं. आम्ही दिवसाला सात-आठ सभा घ्यायचो. शेवटच्या सभेला साडेनऊ- पावणेदहा व्हायचे. मग शेवटचे पंधरा मिनिटं हातात असायची.

### आता दहाच्या आत आटपायला लागतं

पंधरा मिनिटांत करायचं काय? मग भाषणाची सुरुवातच अशी करायचो आम्ही. घड्याळ पाहायचो आणि म्हणायचो की आता सव्वानऊ झालेले आहेत. त्याच्या कॅमेऱ्यात सव्वानऊ रेकॉर्ड व्हायचं. मग पुढचे पाऊण तास आम्ही भाषण ताणायचो. आता हे हल्ली करता येत नाही. त्यामुळे आता दहाच्या आत आटपायला लागतं."राज ठाकरेंनी आज ठाण्यातील सभेत अभिनेते आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उपनेते शरद पोंक्षे आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची नात असिलता राजे यांना कार्यक्रमासाठी आमंत्रित केलं होतं. त्याबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले.

# समान नागरी कायदा लागू होईल!

## अमित शहांनी आदिवासी बांधवांना दिलं आश्वासन?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ( AMIT SHAH ) यांनी झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी वचननामा जाहीर केला आहे. यामध्ये झारखंडमध्ये समान नागरी कायदा (UCC) लागू होईल अशी घोषणा अमित शाह ( AMIT SHAH ) यांनी केली आहे. तरीही आदिवासी बांधवांना एक महत्त्वाचं आश्वासन दिलं आहे. बांगलादेशी घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी या कायद्याची मदत होईल असंही अमित शाह ( AMIT SHAH ) यांनी म्हटलं आहे.**



मी आज तुम्हाला हे सांगू इच्छितो की झारखंडमध्ये समान नागरी कायदा नक्की आणला जाईल. मात्र आदिवासी बांधवांना या कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवलं जाईल. त्यांच्या हक्कांचं रक्षण केलं जाईल.आदिवासी समुदाय हा या कायद्याच्या कक्षेबाहेर असेल. असंही अमित शाह ( AMIT SHAH ) म्हणाले.अमित शाह ( AMIT SHAH ) यांनी हे वक्तव्य केलं आहे. मात्र असं वक्तव्य करणारे मोदी सरकारमधले ते पहिले मंत्री नाहीत. याआधीही या प्रकारच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. भाजपाने कौटुंबिक कायद्यांच्या संदर्भात समानता आणण्यासाठी कायमच प्रयत्न केले आहेत. मात्र त्याचवेळी आदिवासी समुदायाचे हक्क आणि त्यांचे अधिकार यांचं रक्षण केलं जाईल हे आश्वासनही दिलं आहे. भाजपा जनसंघ होता तेव्हापासूनच या पक्षाची विचारसरणी ही समान नागरी कायद्याच्या बाजूने झुकलेली आहे. मुस्लिम पर्सनल लॉवर जनसंघ असो किंवा भाजपा कायमच प्रश्न उपस्थित केले आहेत. मागील वर्षभरात निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून आदिवासी बांधवांना कुठलाही त्रास दिला जाणार नाही अशी आश्वासनं दिली जात आहेत. एक काळ असा होता की भाजपा हा शेठजी आणि भटजींचा पक्ष म्हणून ओळखला जात असे. आता भाजपाने मागास, आदिवासी, दलित मतदारांना आकर्षित करण्यासाठी त्या त्या प्रकारची राजकीय कार्ड्स खेळली आहेत. रविवारी अमित शाह यांनी जी घोषणा केली त्यातही त्यांनी आदिवासींचे हक्क आणि अधिकार यांचं रक्षण केलं जाईल हे आवर्जून सांगितलं. हा भाग याच कार्ड्चा आहे असं म्हणता येतं.२०२३ मध्ये भाजपाचे दिवंगत नेते सुशील मोदी यांनीही हाच मुद्दा म्हणजेच समान नागरी कायद्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी त्यांनी हे आवर्जून सांगितलं होतं की ईशान्येकडील राज्यांना UCC म्हणजेच समान नागरी कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवलं पाहिजे.याच महिन्यात केंद्रीय मंत्री किरेण रिजिजू यांनी हे अरुणाचल प्रदेशातील प्रश्नांवर माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा त्यांनीही हे स्पष्ट केलं होतं की आम्हाला अरुणाचल प्रदेश असो किंवा आदिवासी बहुल भाग असो त्या ठिकाणी UCC म्हणजेच समान नागरी कायद्यावर चर्चा करण्याची आवश्यकता नाही. त्या ठिकाणी काही नियम करायचे असतीलच तर आम्ही त्यासाठी घटनेचा अभ्यास करु. तसंच जे कायदे तयार केले जातात ते देशाच्या भल्यासाठीच असतात. त्यांचा उद्देश लोकांचं हित हाच असतो. याचप्रमाणे २०२३ मध्ये भाजपाचेच मंत्री एस. पी. बघेल यांनीही हेच सांगितलं होतं की राजकारण आपल्या जागी आहे आणि समान नागरी कायदा आपल्या जागी. भाजपाने एका आदिवासी समाजातील महिलेची निवड राष्ट्रपती या पदासाठी केली. तसंच भाजपात अनेक आमदार, खासदार हे आदिवासी समुदायाचे आहेत. आम्हाला कुठल्याही धर्माच्या भावना दुखवायच्या नाहीत असंही त्यांनी त्यावेळी म्हटलं होतं.

### बिस्वा सरमांनी काय म्हटलं होतं?

उत्तराखंड आणि गुजरातनंतर आसाम हे तिसरं राज्य असेल जिथे समान नागरी कायदा लागू होईल असं आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी ठामपणे सांगितलं होतं. तसंच या कायद्याच्या कक्षेतून आदिवासी बांधव नसतील हे सांगायलाही ते विसरले नाहीत. उत्तराखंड राज्याने जो कायदा आणला त्यातल्या मसुद्यातही ही बाब नमूद आहे की आदिवासी समाजाला यातून वगळण्यात आलं आहे. समानतेचा अर्थ आदिवासी प्रथा मोडीत काढणं नाही असंही वाक्य त्यात लिहिण्यात आलं आहे. आदिवासींना समान नागरी कायद्याच्या कक्षेतून बाहेर ठेवण्याच्या निर्णयावरुन भाजपाला अनेकदा टीकेचा सामना करावा लागतो. तरीही भाजपाने हा आग्रह सोडलेला नाही.तसंच बघेल असंही म्हणाले होते की घटनेतील सहाव्या सूचीनुसार आदिवासी बहुल राज्यांसाठी वेगळी तरतूद करण्यात आली आहे.भाजपाने कौटुंबिक कायद्यांच्या संदर्भात समानता आणण्यासाठी कायमच प्रयत्न केले आहेत.

---

# जो बायडेन विरुद्ध एलॉन मस्क कलगीतुरा!

## जो बायडेन यांनी एलॉन मस्क यांच्या दिशेनं मोर्चा वळवला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजकीय टीकेची भाषा खालावत चालली असल्याची चर्चा महाराष्ट्राच्या राजकारणात वारंवार ऐकायला मिळत आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे), शिवसेना (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि थेट भारतीय जनता पक्षापर्यंत अनेक नेते एकमेकांवर खालच्या पातळीवर टीका करताना दिसत आहेत.**



एकीकडे महाराष्ट्रातल्या या राजकीय भाषेची चर्चा होत असताना दुसरीकडे थेट जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेतल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतही काहीसं असंच चित्र निर्माण झाल्याचं चित्र दिसू लागलं आहे. जो बायडेन आणि एलॉन मस्क यांच्यात नुकताच रंगलेला कलगीतुरा याचंच एक उदाहरण म्हणता येईल!अमेरिकेतली अध्यक्षपदाची निवडणूक आता अंतिम टप्प्यात आली आहे. डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस व रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यामध्ये शेवटच्या टप्प्यात काँटे की टक्कर पाहायला मिळत आहे. एकीकडे डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक भाषणांच्या जोरावर मैदान मारून नेण्याचा प्रयत्न करत असताना दुसरीकडे कमला हॅरिस अमेरिकन जनतेबरोबरच अमेरिकेतील इतर देशांमधील नागरिक व स्थानिक गटांना साद घालत विजयासाठी प्रयत्न करत आहेत.टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना पाठिंबा दर्शवल्यानंतर ट्रम्प यांचं पारडं जड झाल्याचं चित्र निर्माण झालं.

### शेवटच्या टप्प्यात काँटे की टक्कर

त्यामुळे आता बायडेन यांच्याकडून ट्रम्प यांच्याबारोबरच एलॉन मस्क यांनाही लक्ष्य केलं जाऊ लागलं आहे. या दोघांमधल्या अशाच एका आरोप-प्रत्यारोपांची सध्या सोशल मीडियावर चर्चा होऊ लागली आहे.जो बायडेन यांची शनिवारी पेनसिल्वानियामध्ये प्रचारसभा झाली. यावेळी त्यांनी विरोधी पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या समर्थकांवर तोंडसुख घेतलं. "ट्रम्प आणि त्यांच्या समर्थक मित्रांना श्रीमंतांचे कर मोठ्या प्रमाणावर कमी करायचे आहेत. मी तुम्हाला सांगतो, मी जेव्हा स्क्रँटनमध्ये होतो.

# ही मुलगी पनवती..., विद्या बालनने सांगितली ‘ती’ आठवण

अभिनेत्री विद्या बालन सध्या ‘भुलभूलैय्या ३’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. तिची मंजोलिकाची भूमिका प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. या चित्रपटातील आधीच्या भागातदेखील तिच्या भूमिकेचे कौतुक होताना दिसले होते. ‘नीयत’, ‘दो और दो प्यार’, ‘शेरनी’, ‘शंकुतला देवी’, ‘मिशन मंगल’, ‘नटखट’, ‘तुम्हारी सुलु’, ‘बेगम जान’, ‘कहानी २’, ‘एक अलबेला’, ‘बॉबी जासूस’, ‘शादी के साइड इफेक्ट्स’ अशा अनेक चित्रपटांतून अभिनेत्रीने प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. आता एका मुलाखतीत विद्या बालनने तिला करिअरच्या सुरुवातीच्या काळात कोणत्या गोष्टींचा सामना करावा लागला याचा खुलासा केला आहे.अभिनेत्री विद्या बालनने नुकतीच कार्तिक आर्यनबरोबर ‘इन्स्टंट बॉलीवूडला’ मुलाखत दिली. या मुलाखतीत विचारण्यात आले की, तुमच्या आयुष्यात अशी कोणती परिस्थिती होती, ज्यावेळी तुम्हाला वाटले की त्या परिस्थितीला तुम्ही सामोरे जाऊ शकणार नाही. यावर उत्तर देताना विद्या बालनने म्हटले, ” माझ्या करिअरच्या सुरुवातीच्या काळात मला नकाराचा खूप सामना करावा लागला. मला कोणत्याही चित्रपटात घेतले जात नव्हते. तो काळ खूप कठीण होता. मी एका मल्याळम चित्रपटात काम करत होते. त्याचे शूटिंग सुरू झाले मात्र ते मध्येच बंद पडले. त्यानंतर त्यांनी म्हणायला सुरुवात केली, ही मुलगी पनवती आहे. जेव्हापासून ही या चित्रपटाचा



भाग बनली आहे, काही ना काही अडचणी येत आहेत आणि आता तर शूटिंगच बंद पडले; तर मला वाटते, खूप चित्रपटातून मला या कारणासाठी बाहेर काढण्यात आले. मी त्यावर विश्वास ठेवायला लागले. मी विचार करायला लागले की, मी खरंच पनवती तर नाही? अशा काळात तुम्ही विचार करता की तुमची स्वप्नं कधी पूर्णच होणार नाहीत, तो सर्वात कठीण काळ होता”, असे म्हणत विद्या बालनने संघर्षाच्या काळातील आठवण सांगितली आहे.काही दिवसांपूर्वी कार्तिक आर्यनने एका मुलाखतीत बॉलीवूडमध्ये सात वर्षे काम केल्यानंतर ज्या घरात मी राहत होतो, त्याचे भाडे द्यायला पैसे नव्हते. त्यावेळी मी खूप संघर्ष करत होतो, अशी आठवण सांगितली आहे. महत्वाचे म्हणजे, कार्तिक आर्यन आणि विद्या बालन यांच्याबरोबरच माधुरी दीक्षितदेखील मुख्य भूमिकेत आहे. आता हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर किती कमाई करणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# दोन सुपरस्टार एकाच फ्रेममध्ये!

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते कमल हासन (KAMAL HAASAN) आणि अभिनेते रजनीकांत (RAJINIKANTH) यांचा चहता वर्ग मोठा आहे. रजनीकांत आणि कमल हासन यांनी साऊथ चित्रपटसृष्टीसोबतच बॉलिवूडमध्ये देखील विशेष लोकप्रियता मिळवली आहे. नुकतेच कमल हासन आणि रजनीकांत यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. रजनीकांत आणि कमल हासन यांनी 21 वर्षानंतर एकाच स्टुडिओमध्ये शूटिंग केले आहे. लायका प्रॉडक्शन या ट्विटर अकाऊंटवरुन कमल हासन आणि रजनीकांत यांचे फोटो शेअर करण्यात आले आहेत. या फोटोला कॅप्शन देण्यात आले, "कमल हासन आणि रजनीकांत यांनी 21 वर्षांनंतर एकाच स्टुडिओमध्ये त्यांच्या इंडियन-2 आणि थलाइवर 170 या चित्रपटांचे शूटिंग केले." लायका प्रॉडक्शनच्या ट्विटर अकाऊंटवरुन शेअर करण्यात आलेल्या कमल हासन आणि रजनीकांत यांच्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.

# 'आंख मारे' या गाण्यावर डान्स



मध्य प्रदेशातील दमोह विधानसभा मतदारसंघातील आम आदमी पार्टीच्या महिला उमेदवार आणि अभिनेत्री चाहत पांडे (CHAHAT PANDEY) या सध्या चर्चेत आहेत. चाहत यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये चाहत या 'सिम्बा' चित्रपटातील 'आंख मारे' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत. मध्य प्रदेशातील दमोह विधानसभा मतदारसंघातून आम आदमी पक्षाच्या (आप) महिला उमेदवार चाहत पांडे यांच्या व्हायरल झालेल्या एक मिनिट सहा सेकंदाच्या व्हिडीओमध्ये त्या डान्स करताना दिसत आहे. मात्र, हा व्हिडीओ कधीचा आहे? ही माहिती अजून समोर आलेली नाही. चाहत पांडे यांच्या डान्सच्या व्हिडीओवर अनेक लोकांनी कमेंट्स केल्या आहे. काही लोकांनी या व्हिडीओला कमेंट करुन चाहत पांडे यांना ट्रोल देखील केलं आहे. 'हे बघा, आम आदमी पार्टीचे विधानसभेच्या उमेदवार, ज्यांना आमदार होऊन जनतेची सेवा करायची आहे. हे त्यांचे खरे रूप आहे का?", असं म्हणत काही नेटकऱ्यांनी चाहत पांडे यांना ट्रोल केलं.काही नेटकऱ्यांचे म्हणणे आहे की, राजकारणात येण्यापूर्वी चाहत पांडे या छोट्या पडद्यावरील अभिनेत्री होत्या, मग त्यांनी डान्स करण्यात काय हरकत आहे? तर काही लोक, "हे योग्य नाही." असं म्हणत आहेत. चाहत पांडे यांनी काही मलिकांमध्ये काम केलं. त्यांनी वयाच्या 17 व्या वर्षी पवित्र बंधन या टीव्ही शोमधून आपल्या अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीला सुरुवात केली. तेनालीरामन, राधा कृष्णन, सावध इंडिया, नागिन-2, दुर्गा-माता की छाया, अलादीन आणि क्राइम पेट्रोल या मालिकांमध्ये देखील त्यांनी काम केलं. सध्या त्या 'नाथ जेवर या जंजीर' या टीव्ही शोमधून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या मालिकेत त्या महुआ ही भूमिका साकारत आहे. मध्य प्रदेशातील दमोह येथे राहणाऱ्या चाहत पांडे या जून महिन्यामध्ये आम आदमी पार्टीमध्ये प्रवेश केला होता. भाजपने ज्येष्ठ नेते जयंत मलाय्या यांच्या विरोधात दमोहमधून चाहत यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्याचवेळी काँग्रेसचे विद्यमान आमदार अजय टंडन यांचाही या लढतीत सहभाग आहे.

# ॲनिमल अंगावर शहारे आणणारा !

अभिनेता रणबीर कपूर (RANBIR KAPOOR) हा त्याच्या चाहत्यांच्या वर्षाचा शेवट धमाकेदार पद्धतीनं करणार आहे. कारण रणबीरचा ॲनिमल (ANIMAL) हा चित्रपट रिलीज होत आहे. या चित्रपटाचा टीझर आणि या चित्रपटामधील अर्जन वेली हे गाणं काही दिवसांपूर्वी रिलीज झालं. टीझर आणि गाणं पाहिल्यानंतर रणबीरचे चाहते या चित्रपटाच्या ट्रेलरची उत्सुकतेने वाट बघत होते. आता ॲनिमल या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. रणबीरच्या ॲनिमल या चित्रपटामधून प्रेक्षकांना ॲक्शन, ड्रामा आणि इमोशन्सची ट्रीट मिळणार आहे,असा अंदाज ॲनिमल या चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर लावला जाऊ शकतो. ट्रेलरची सुरुवात अनिल कपूर आणि रणबीर कपूर यांच्या एका सीननं होते. या सीनमध्ये रणबीर आणि अनिल यांचा जबरदस्त अभिनय बघायला मिळत आहे. ट्रेलरमध्ये दिसत आहे की अनिल कपूर हे रणबीरचे वडिल आहेत आणि वडिलांसाठी रणबीर काहीही करायला तयार असतो. ॲनिमल या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये बॉबी देओलची झलक अवघ्या काही सेकंद दिसते.



# ईशा तलवारनं सांगितलं संस्कृत भाषेचं महत्व

अभिनेत्री ईशा तलवार ही एक चर्चेतील सेलिब्रेटी आहे. ती तिच्या परखड वक्तव्यांसाठी ओळखली जाणारी अभिनेत्री नसून आता तिनं कलाकारांना संस्कृत भाषा शिकण्याचा सल्ला दिला आहे. केरळ ते तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थान असे करत आता पंजाबमध्ये आली आहे. पंजाबच्या मनोरंजन विश्वात ईशाची इंट्री झाली आहे. पंजाबी मालिका चमक मध्ये झळकणार असल्याचे सांगण्यात येत आहे. ईशानं अमर उजालाला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये संस्कृत भाषेविषयी केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे. त्या वक्तव्याची दखल घेण्याचे दुसरे एक महत्वाचे कारण म्हणजे यापूर्वी कोणत्याही कलाकारानं संस्कृत भाषेवरुन वेगळ्या प्रकारे मत व्यक्त केलेलं ऐकीवात नाही. ईशाचं म्हणणं आहे की, कलाकारांना वेगवेगळ्या भाषेचं ज्ञान असणं जास्त गरजेचं आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व फारच प्रभावी होते. ते अधिक संवाद साधू शकतात. त्यांची अभिव्यक्ती वाढते. त्यांना वेगवेगळ्या प्रकारे स्वताला सादर करता येते. थोडक्यात त्यांच्या अभिनयातील सशक्तता वाढीस लागते. तुम्ही जर एकाच भाषेत संवाद साधत असाल तर तुम्हाला काही गोष्टींपासून वंचित राहावे लागते. भाषा हे अभिव्यक्त होण्याचे माध्यम आहे. पण तुम्ही जर बहुभाषिक असाल तर तुम्हाला त्याचा फायदाच होतो तोटा नाही. मला या सगळ्यात महत्वाची वाटते ती संस्कृत भाषा. ही देवभाषा आहे असे आपण म्हणतो. पण ही भाषा सगळ्या भाषांची जननी आहे हे देखील आपण लक्षात घेण्याची गरज आहे.

# ‘प्लीज मला हरवू नकोस हां..!

## पॅट कमिन्सच्या हातावर हात ठेवल्याने रिझवान ट्रोल

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियाने पहिल्या वनडे सामन्यात पाकिस्तानचा दोन विकेट्सनी पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. दोन्ही संघांतील बहुप्रतिक्षित पहिला वनडे सामना मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर पार पडला. याआधी दोन्ही संघ २०२३ मध्ये भारतात झालेल्या वनडे विश्वचषकात आमनेसामने आले होते, ज्यामध्ये पॅट कमिन्सच्या नेतृत्त्वाखाली ऑस्ट्रेलियाने संघाने पाकिस्तानचा पराभव केला होता. मात्र, आता पाकिस्तान संघाचा कर्णधार बदलला आहे. सध्या पाकिस्तानची धुरा मोहम्मद रिझवान सांभाळत आहे. ज्याच्याबद्दल सोशल मीडियावर तुफान मीम्स व्हायरल होत आहेत.**




बाबर आझमने अलीकडेच पदावरून पायउतार झाल्यानंतर आता पाकिस्तानची धुरा मोहम्मद रिझवान सांभाळत आहे, जो मर्यादित षटकांतील क्रिकेटमध्ये संघाचे नेतृत्व करत आहे. अतिशय लक्ष केंद्रित आणि दृढनिश्चयी कर्णधार असलेल्या रिझवानने ऑस्ट्रेलियाला मालिकेत पराभूत करण्याची स्वप्न उराशी बाळगले आहे. पाकिस्तान संघाने वकार युनूसच्या नेतृत्वाखाली २००२ मध्ये अखेरची मालिका जिंकली होती. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी पॅट कमिन्ससोबतच्या रिझवानच्या ताज्या फोटोशूटने ट्विटरवर चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यांना वेड लावले. या फोटोंमध्ये कमिन्स आणि रिझवान ट्रॉफीसोबत हसत आणि पोज देताना दिसत आहेत. या फोटोंमध्ये पाकिस्तानच्या कर्णधाराचा हात कमिन्सच्या हाताच्यावर दिसत होता, ज्याने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर चाहत्यांनी या फोटोवरुन नेहमीप्रमाणे मीम्स तयार करुन पाकिस्तानी कर्णधाराला ट्रोल करायला सुरुवात केली. ज्याचे फोटो आणि मीम्स सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत.पहिल्या वनडे ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. ऑस्ट्रेलियाच्या घातक गोलंदाजीमुळे पाकिस्तानने ७० धावांपर्यंत ४ विकेट्स गमावल्या होत्या आणि दरम्यान बाबर आझम ३७ धावांवर ॲडम झम्पाच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. नवा कर्णधार मोहम्मद रिझवानने ४४ धावा केल्या. शाहीन आफ्रिदीने २४ धावांची तर नसीम शाहने ४० धावांची खेळी खेळून प्रभावित केले. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने सर्वाधिक विकेट घेतल्या, ज्याने ३ फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले.२०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाची सुरुवातही खराब झाली. मॅथ्यू शॉर्ट आणि जेक फ्रेझर मॅकगर्क यांनी २८ धावांच्या स्कोअरवर विकेट्स गमावल्या होत्या. त्यानंतर, स्टीव्ह स्मिथ आणि जोश इंग्लिस यांनी संघाचा डाव सावरला. या दोघांमधील ८५ धावांच्या भागीदारीमुळे सामना यजमान ऑस्ट्रेलियाच्या बाजूने झुकला. मात्र स्टीव्ह स्मिथ ४४ आणि इंग्लिस ४९ धावा करून बाद झाला. अखेर मिचेल स्टार्क आणि कर्णधार पॅट कमिन्सने ९९ चेंडू शिल्लक असताना संघाच्या विजयावर शिक्कमोर्तब केला. बाबर आझमने अलीकडेच पदावरून पायउतार झाल्यानंतर आता पाकिस्तानची धुरा मोहम्मद रिझवान सांभाळत आहे, जो मर्यादित षटकांतील क्रिकेटमध्ये संघाचे नेतृत्व करत आहे. अतिशय लक्ष केंद्रित आणि दृढनिश्चयी कर्णधार असलेल्या रिझवानने ऑस्ट्रेलियाला मालिकेत पराभूत करण्याची स्वप्न उराशी बाळगले आहे. पाकिस्तान संघाने वकार युनूसच्या नेतृत्वाखाली २००२ मध्ये अखेरची मालिका जिंकली होती. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी पॅट कमिन्ससोबतच्या रिझवानच्या ताज्या फोटोशूटने ट्विटरवर चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आणि त्यांना वेड लावले. या फोटोंमध्ये कमिन्स आणि रिझवान ट्रॉफीसोबत हसत आणि पोज देताना दिसत आहेत. या फोटोंमध्ये पाकिस्तानच्या कर्णधाराचा हात कमिन्सच्या हाताच्यावर दिसत होता, ज्याने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर चाहत्यांनी या फोटोवरुन नेहमीप्रमाणे मीम्स तयार करुन पाकिस्तानी कर्णधाराला ट्रोल करायला सुरुवात केली.

### स्टार्कने सर्वाधिक विकेट घेतल्या

ज्याचे फोटो आणि मीम्स सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत.पहिल्या वनडे ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. ऑस्ट्रेलियाच्या घातक गोलंदाजीमुळे पाकिस्तानने ७० धावांपर्यंत ४ विकेट्स गमावल्या होत्या आणि दरम्यान बाबर आझम ३७ धावांवर ॲडम झम्पाच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. नवा कर्णधार मोहम्मद रिझवानने ४४ धावा केल्या. शाहीन आफ्रिदीने २४ धावांची तर नसीम शाहने ४० धावांची खेळी खेळून प्रभावित केले. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने सर्वाधिक विकेट घेतल्या.

# घटस्फोटानंतर शिखर धवन पुन्हा प्रेमात?

## मिस्ट्री गर्लबरोबरचा व्हीडिओ व्हायरल, ‘त्या’ कृतीने वेधलं लक्ष

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोशल मीडियावर विविध व्हीडिओच्या माध्यमातून कायमचं चर्चेत असलेला क्रिकेटपटू म्हणजे शिखर धवन. शिखर धवनने २०२४ मध्ये व्हीडिओ शेअर करत क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली. पण आता शिखर धवनचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो एका नवीन मुलीबरोबर दिसत आहे.**



शिखर धवन नवीन मिस्ट्री गर्लबरोबर मुंबई विमानतळावर स्पॉट झाला होता आणि तेथील त्याचा हा व्हीडिओ सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.धवनबरोबर दिसणारी ही नवी मिस्ट्री गर्ल कोण आहे? याबाबतची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. पण धवन आता घटस्फोटानंतर पुन्हा एकदा प्रेमात पडला आहे आणि तो या मुलीशी लग्न करणार का असे बरेच प्रश्न चाहत्यांमध्ये सुरू आहेत, त्यामुळे या व्हीडिओमध्ये ही मिस्ट्री गर्ल कोण आहे, अशी चर्चा आता चाहत्यांमध्ये रंगली आहे. शिखर धवनबरोबरच ती मिस्ट्री गर्लसुद्धा कारमधून उतरली. यानंतर ती कॅमेराकडे पाठमोरी उभी होती. इतकंच नव्हे तर ही कोणी भारतीय नसून विदेशी आहे. एअरपोर्टमध्ये आत जाईपर्यंत ती धवनपासून खूप लांब आणि मागे उभी होती, जेणेकरून त्या दोघांचा कोणी एकत्र फोटो क्लिक करू नये.शिखर धवन आणि त्याची पत्नी आयेशा मुखर्जी यांचा गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये घटस्फोट झाला. धवन आणि आयेशा यांना झोरावर नावाचा एक मुलगाही आहे. मात्र, आता धवन नव्या मिस्ट्री गर्लबरोबर दिसल्याने चर्चांना उधाण आलं आहे. पण धवनने मात्र अद्याप याबाबत अधिकृत काहीही जाहीर केलेले नाही.

### धवनला संधी मिळत नव्हती

हा व्हीडिओ विरल भय्यानी या पापराझी पेजवरून शेअर करण्यात आला आहे.धवनने याच वर्षी क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली होती. आयपीएलसह देशांतर्गत स्पर्धांपासूनही त्याने स्वतःला दूर ठेवले आहे. धवन भारतीय संघातून गेल्या अनेक काळापासून बाहेर आहे. संघात युवा खेळाडूंना दिलेल्या संधीमुळे धवनला टीम इंडियात संधी मिळत नव्हती, त्यामुळे त्याला निवृत्तीची घोषणा करावी लागली.